Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 05 November 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०५ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जनसंपर्क रॅलीला नागपूर इथं आज सकाळी सुरुवात झाली. देवेंद्र फडणवीस हे नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. महाविकास आघाडीकडून काँग्रेसनं प्रफुल्ल गुडधे यांना उमेदवारी दिली आहे.

दरम्यान, बारामतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची जाहीरसभा सुरु आहे. आज दिवसभरात शरद पवार बारामतीत सहा सभा आणि मेळावे घेणार आहे. बारामतीमधून महाविकास आघाडीकडून युगेंद्र पवार तर महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रसचे अजित पवार निवडणूक लढवत आहेत.

***

विधानसभा निवडणुकीसाठी परिवर्तन महाशक्ती आघाडीनं १२१ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू, राजू शेट्टी, वामनराव चटप, धनंजय जाधव यांच्यासह अनेक समविचारी नेत्यांची नागपूर इथं बैठक झाली. या बैठकीत ही यादी जाहीर करण्यात आली. कसलाही वाद न होता जागावाटप पूर्ण झालं असल्याचं छत्रपती संभाजीराजे यांनी सांगितलं.

***

नांदेड जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या महत्त्वपूर्ण टप्प्याची सुरूवात आज पासून झाली आहे. नऊ विधानसभेसाठी १६५ उमेदवार मैदानात आहेत तर नांदेड जिल्ह्यात याचवेळी होणाऱ्या लोकसभा पोटनिवडणुकीसाठी १९ उमेदवार रिंगणात आहेत. उमेदवारांना प्रचारासाठी १४ दिवस मिळणार असून २० नोव्हेंबरला मतदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. त्यामुळे पुढच्या रणधुमाळीत उमेदवारांपासून ते सामान्य मतदारांपर्यंत सर्वांनीच आदर्श आचारसंहितेचं काटेकोर पालन करावं तसंच भयमुक्त आणि पारदर्शी वातावरणात मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य

पूर्ण करावं, असं आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.
नांदेड जिल्ह्यात १ हजार ९९२ मतदान केंद्र असून शहरी ३९६ तर ग्रामीण १ हजार ५९६मतदान केंद्र आहेत. शंभर टक्के मतदान अधिकारी महिला असलेले ९ मतदान केंद्र तर शंभर टक्के दिव्यांग अधिकारी असलेलीदेखील ९ मतदान केंद्र आहेत. संवेदनशील मतदान केंद्रांची संख्या जिल्ह्यात ५ आहे.

****

लातूर इथे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मनुष्यबळाचं दुसरं सरमिसळीकरण जिल्हाधिकारी कार्यालयात काल पार पडलं. याद्वारे मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी आणि इतर मतदान अधिकारी यांचा समावेश असलेली पथकं गठीत करून त्याचं विधानसभा मतदारसंघ निहाय वाटप करण्यात आलं.
मतदान केंद्रांवर नियुक्त प्रत्येक पथकात एक मतदान केंद्राध्यक्ष, एक प्रथम मतदान अधिकारी आणि दोन इतर मतदान अधिकारी यांचा समावेश राहणार आहे. औसा विधानसभा मतदारसंघात ३०९ मतदान केंद्रांसाठी ३४४ मतदान पथकं, लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात ३६३ मतदान केंद्रांसाठी ४०३, लातूर शहर विधानसभा मतदारसंघात ३८९ मतदान केंद्रांसाठी ४३२, अहमदपूर विधानसभा मतदारसंघात ३७६ मतदान केंद्रांसाठी ४१९, उदगीर विधानसभा मतदारसंघात ३५९ मतदान केंद्रांसाठी ३९९, तर निलंगा विधानसभा मतदारसंघात ३४७ मतदान केंद्रांसाठी ३८६ मतदान पथकं गठीत करण्यात आली आहेत.

****

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'Sunflowers Were the First Ones to Know' या लघुचित्रपटाला प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्कारांच्या लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म या प्रकारात नामांकन मिळालं आहे. चिदानंद एस. नाईक यांचं दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटानं यंदाच्या कान चित्रपट महोत्सवात ला सिनेफ विभागात प्रथम पुरस्कार पटकावला होता.

****

श्रीक्षेत्र पंढरपूर इथं कार्तिकी एकादशी निमित्त आजपासून श्री विठ्ठलाचं दर्शन भाविकांसाठी २४ तास खुलं राहणार असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. कार्तिकी यात्रा संपेपर्यंत विठ्ठल मंदिर चोवीस तास भाविकांसाठी खुलं असणार आहे.

****

शासकीय सेवानिवृत्तधारक तसंच कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी हयातीचे दाखले ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत सादर करावेत, असं आवाहन धुळे जिल्हा कोषागार अधिकारी प्रविण पंडित यांनी केलं आहे. निवृत्ती वेतन आणि कुटुंब निवृत्ती वेतनधारकांची नोव्हेंबर महिन्यात हयातीबाबत नियतकालीक ओळख पडताळणी दरवर्षी करण्यात येते. जिल्हा कोषागार कार्यालयाने निवृत्तीवेतन, कुटूंब निवृत्ती वेतन धारकांचे नाव, निवृत्तीवेतन क्रमांक व बँक खाते क्रमांक असलेले मुद्रीत दाखले संबंधित बँक शाखेत उपलब्ध करुन दिले आहेत.

****